**सरकारी कामगार अधिकारी, गट-ब या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या-२०२६.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन आदेश क्र.बदली-०४२६/प्र.क्र.१०१/२/कामगार-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०२ जून, २०२६.

**वाचा:-** "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५"

**शासन आदेश:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) मधील तरतूदीनुसार खाली नमूद केलेल्या कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील कामगार उप आयुक्त, गट-अ या संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | सध्याचे कार्यरत कार्यालय | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. रा. प्र. तोडकर | सरकारी कामगार अधिकारी-१, सहायक कामगार आयुक्त कार्यालय, इचलकरंजी. | सरकारी कामगार अधिकारी-२, सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कोल्हापूर. |
| २ | श्रीम. वर्षा अक्षय गायकवाड | सरकारी कामगार अधिकारी-४, कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई. | सरकारी कामगार अधिकारी-२, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई. |
| ३ | श्री. अ. अ. देशमुख | सरकारी कामगार अधिकारी-१, सहायक कामगार आयुक्त कार्यालय, लातूर. | सरकारी कामगार अधिकारी, बीड. |
| ४ | श्री. श्री. ह. चौभे | सरकारी कामगार अधिकारी-१, अपर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे. | सरकारी कामगार अधिकारी-७, कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय, पुणे. |
| ५ | श्री. स. ध. कोल्हाळ | सरकारी कामगार अधिकारी-१, कामगार उप आयुक्त कार्यालय, रायगड. | सरकारी कामगार अधिकारी-१, अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे. |
| ६ | श्री. गु. रा. पंधरे | सरकारी कामगार अधिकारी-१, अपर कामगार आयुक्त कार्यालय,नागपूर. | सरकारी कामगार अधिकारी-६, कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर. |
| ७ | श्री. अ. मा. जाधव | सरकारी कामगार अधिकारी-१, सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, जालना. | सरकारी कामगार अधिकारी-१, कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय, रायगड. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्रीम. या. अ. ग. शेख | सरकारी कामगार अधिकारी-१, सहायक कामगार आयुक्त कार्यालय, नांदेड. | सरकारी कामगार अधिकारी, बार्शी. |

२. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू होण्यासाठी ते धारण करत असलेल्या पदावरुन या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. त्यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू होणे अनिवार्य आहे.

३. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतूदींनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापूर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/कार्यासन-१४, दि.२३.१२.२०१६ मधील तरतूदींनुसार **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा **अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" (dies non) म्हणून गणला जाईल.** याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

६. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०६०२१६२७२१४२१० असा आहे. सदर शासन आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C9638764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.06.02 16:28:17 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

कामगार आयुक्त, कामगार भवन, ब्लॉक-ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत,**

१. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सह आयुक्त कामगार (माथाडी), कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४. अपर कामगार आयुक्त (कोकण/पुणे/नागपूर).
५. कामगार उप आयुक्त (नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती).
६. कामगार उप आयुक्त (प्रशासन) कामगार भवन, ब्लॉक-ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
७. सर्व संबंधित अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
८. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुदेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. संबंधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११. उप सचिव (कामगार-८) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. निवडनस्ती (कामगार-८)